**महाराष्ट्र शासन**

**कृषि विभाग**

**<u>प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उदयोग योजना (PMFME)</u>**

**<u>महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांकरीता "एक जिल्हा एक उत्पादन" धोरणानुसार प्रकल्प उभारणीकरीता</u>**

**<u>सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) करणेसाठी दरपत्रके मागविण्याबाबत...</u>**

प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग (PMFME) या योजनेअंतर्गत "एक जिल्हा एक उत्पादन" धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनांच्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येणार आहे. यामध्ये फळे व भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया, मत्स्य, दुग्ध व किरकोळ वन उत्पादनावर इत्यादींवर आधारित नव्याने स्थापन होणारे प्रकल्प किंवा कार्यरत सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचा समावेश असणार आहे. याकरिता शेतकरी उत्पादक कंपनी / गट / संस्था, स्वयंसहाय्यता गट व उत्पादक सहकारी संस्था, सहकारी उत्पादक किंवा खाजगी उदयोग क्षेत्र, वैयक्तिक शेतकरी, ग्रामीण बेरोजगार युवक, इत्यादींना योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. प्रकल्प उभारणीकरीता बँकेबल DPR तयार करावयाचे आहेत. याअनुषंगाने आर्थिक दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छुक संस्थां ज्यांना सुक्ष्म अन्न प्रक्रिया उदयोग / कृषि प्रक्रिया उदयोग संदर्भात DPR बनविण्याचा अनुभव आहे अशांनी आपली दरपत्रके जाहिरातीच्या प्रसिध्दी दिनांकापासून १० दिवसांच्या आत पोस्टाव्दारे / सिलबंद लिफाफ्यात / Password Protected ई-मेल फाईल मध्ये पाठविण्यात यावीत. याबाबतची सविस्तर माहिती http://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**दिनांक -**

**नोडल अधिकारी (PMFME)**
**तथा**
**संचालक**
**(कृषि प्रक्रिया व नियोजन), पुणे.**

**<u>आर्थिक निकष :-</u>**

केंद्र शासन सहाय्यीत प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उदयोग योजना (PMFME) सुक्ष्म अन्न प्रक्रिया उदयोगांच्या सक्षमीकरणांसाठी आहे. यामध्ये एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) अंतर्गत नविन उद्योग व कार्यरत (Non-ODOP) उद्योगांना अनुदानाचा लाभ आहे. सुक्ष्म अन्न प्रक्रिया उदयोगाकरीता अंदाजित रू. ३०-४० लाखापर्यंत प्रकल्प खर्च येतो. त्यामध्ये प्राथमिक प्रक्रिया, दुय्यम प्रक्रिया इत्यांदीचा समावेश होतो. केंद्र शासनाच्या http://www.iifpt.edu.in व http://www.niftem.ac.in या संकेतस्थळावर सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे DPR उपलब्ध आहेत. त्याच धर्तीवर राज्यातील ODOP अंतर्गत विविध उत्पादनासाठी एकूण ८० DPR बनवावयाचे आहेत. त्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) बनविण्याकरीता कमाल रू. ५०००/- प्रति DPR साठी देय आहे.

**सोबत :** जिल्हानिहाय ODOP ची यादी

**नोडल अधिकारी (PMFME)**
**तथा**
**संचालक**
**(कृषि प्रक्रिया व नियोजन), पुणे.**